# नियमित दिवाणी दावा क्र.४९७/२०१९ मधील नि.६० खालील आदेश

( लिलावती अशोक शिंदे विरुध्द साहेबराव भाऊ अडसुळ, वगैरे )

**CNR No. MHST14-2151-2019**

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.१ ते १० यांनी दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत दावा मिळकती कोणासही विक्री करु नये अगर त्यावर बोजा निर्माण करु नये अगर कसलेही तबदीलीचे व्यवहार करु नये अशी प्रतिवादी क्र.१ ते १० यांना तुर्तातुर्त ताकीद मिळावी याकरीता दाखल केला आहे.

**वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२) **अ)** मौजे तरडगांव, ता.फलटण जि.सातारा गावचे हद्दीतील जमीन मिळकती,

| अ.नं. | गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. चौ.मी. | हिस्सा |
|---|---|---|---|
| १. | २२ | ००.१४ | ००.०२.३३ |
| २. | २९ | ००.२० | ००.०३.३३ |
| ३. | १११ | ००.१६<br>पो.ख. ००.०९<br>एकूण ००.२३ | ००.००.६६ |
| ४. | १३७ | ००.०४ | ००.०२ |
| ५. | १८४ | १ आर विहिर पड | विहिर पाणी पाळीतील हिस्सा |
| ६. | १९८ | ००.०७ | ००.०३.४८ |
| ७. | २१४ | ००.०२ | ००.००.२५ |
| ८. | २२२ | ००.५७<br>पो.ख. ००.०२<br>एकूण ००.५९ | ००.२५.५२ |
| ९. | २२५ | ००.८९ | ००.०६.४० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पो.ख. ००.०३<br>एकूण ००.९२ | |
| १०. | ३८२ | ००.२२ | ००.११ |
| ११. | ३८७ | ००.१८ | ००.०९ |
| १२. | ३९० | ००.०८ | ००.०४ |
| १३. | ४४८ | ०२.६९<br>पो.ख. ००.१२<br>एकूण ०२.८१ | ०१.३४.५२ |
| १४. | ४५१ | ००.६०<br>पो.ख. ००.१८<br>एकूण ००.७८ | ००.३० |
| १५. | १५४ | ००.२६ | ००.२६ |

**ब)** मौजे सासवड (झणझणे), ता.फलटण जि.सातारा गावचे हद्दीतील जमीन मिळकती,

| अ.नं. | गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. चौ.मी. | हिस्सा |
|---|---|---|---|
| १. | १५६३ | ००.८२ | ००.४१ |

**क)** मौजे काळज, ता.फलटण जि.सातारा गावचे हद्दीतील जमीन मिळकती,

| अ.नं. | गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. चौ.मी. | हिस्सा |
|---|---|---|---|
| १. | ३७८ | ०४.९३ | ०२.५७ |

वर नमुद जमीन मिळकती त्यामधील झाडे, झुडपे, दगड माती जमीन मिळकती असून हे प्रस्तुत अर्जाचा विषय असून येथून पुढे त्यास ''दावा मिळकती'' असे संबोधण्यात येईल.

३) वादी यांचे पुढे असे कथन आहे की, सदरचा दावा वादीने सरस–निरस मानाने वाटप होवून वादीचा १/६ हिस्सा अथवा येणारा कायदेशीर हिस्सा वाटपाने तृटक व पृथकपणे वादीचे स्वतंत्रकब्जामध्ये मिळण्यासाठी व जाहीर ठरावाकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मालकीची आहे. दावा मिळकतीचे अद्याप सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. वादीचा दावा मिळकतीमध्ये अविभक्त असा हिस्सा आहे. दावा कलम १क मधील मौजे काळज येथील शेतजमीनीस मयत भाऊ गोविंद अडसुळ यांचे कायदेशीर वारसांची फे.क्र.६६५ अन्वये आठ आणे हिश्याकरीता नोंद झालेली आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ व त्यांचे सख्खे बहिण भाऊ यांचे नावाची फेरफारने नोंद झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी दि.२१.१२.२०१६ रोजी नोंदणीकृत वाटणीपत्र करुन घेतले व प्रतिवादी क्र.१ व ७ ते १० यांच्या नावाची मौजे काळज येथील गट क्र.३७८ चे सातबारा उता–यावर नोंद केली. सदर वाटणीपत्रास वादी यांची संमती घेतली नव्हती.

४) वादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, मौजे झणझणे सासवड येथील दावा कलम १ब मधील सातबारा सदरी फेरफार क्र.१५६ अन्वये मयत भाऊ गोविंद अडसुळ यांचे कायदेशीर वारसांची आठ आणे हिश्यास नोंद झालेली आहे. मौजे तरडगांव येथील दावा कलम १ मधील मिळकतीस देखील भाऊ गोविंद अडसुळ यांच्या वारसांची नोंद झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ व त्यांचे सख्खे बहिण भाऊ यांची वारस म्हणून नोंद झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी गावकामगार तलाठी तरडगांव यांचेकडे चुकीचा व बेकायदेशीर अर्ज देवून प्रतिवादी क्र.३ ते ५ यांच्या नावाची नोंद गट क्र.२२२, १९८, ४४८, १३७ चे सातबारा उता–यास फेरफार क्र.९१२ ने करुन घेतलेली आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी दि.२१.०५.२०१८ रोजी केलेले बक्षीसपत्राकरीता वादी यांची संमती घेतलेली नाही त्यामुळे सदरचे बक्षीसपत्र वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही.

५) वादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, दावा कलम १क मिळकत मौजे काळज येथील मिळकतीचे प्रतिवादी क्र.१ यांनी वडिलोपार्जित मिळकतीचे वाटणीपत्र प्रतिवादी क्र.७ ते १० यांच्या नोंदणीकृत वाटणीपत्रान्वये करुन दिलेले आहे ते चुकीचे

आहे. सदर फेरफारची नोटीस वादी यांना नव्हती. सदर दावा मिळकती या एकत्र कुटुंबाच्या मालकी व वहिवाटीच्या असल्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांना सदर मिळकतीचे वाटपपत्र व बक्षीसपत्र किंवा इतर कोणत्याही हस्तांतरणाचे हक्क व अधिकार नव्हते. सदर वाटपपत्र व बक्षीसपत्र प्रतिवादी क्र.३ ते १० यांचे नावे करणे हे बेकायदेशीर आहे. त्यामुळे ते वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही. सदर वाटणीपत्र व बक्षीसपत्रावर वादी यांची सही नाही. दावा मिळकती या मयत भाऊ गोविंद अडसुळ यांचे वडिलोपार्जित मालकी ताबे वहिवाटीची होती व आहे व त्यांच्या मृत्युनंतर हिंदू वारसाकायद्याचे दुरुस्तीनुसार वादी यांचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे.

६) वादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, प्रस्तुत दाव्याचा न्यायनिर्णय होणेस बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात दावा मिळकतीचे रेकॉर्डला प्रतिवादीची नावे असल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी यांनी दावा मिळकती अन्य् कोणास विक्री करण्याची भाषा करु लागले आहेत. जर दावा मिळकतीची कोणत्याही प्रकारचे खरेदी विक्रीचे व्यवहार अगर तबदीलीचे व्यवहार करु नये तसेच कोणत्याही वित्तीय संस्थेचा बोजा निर्माण करु नये अशी प्रतिवादी यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी म्हणून सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. दावा मिळकती तबदील केल्यास वादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सोय-गैरसोयीचा तराजू वादीचे लाभात झुकणारा आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी दावा मिळकती कोणासही विक्री करु नये अगर त्यावर बोजा निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

७) प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी नि.४५अ वर व प्रतिवादी क्र.१० यांनी नि.५५ व नि.६५ वर कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, दावा कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबाव्यतिरिक्त अन्य भाऊबंदाच्या मालकीच्या आहेत. दावा मिळकत अ.नं.१ व २ या मिळकती पड असून सदर मिळकतीचे अद्याप सर्व हिस्सेदारांमध्ये वाटप झालेले नाही. सर्व हिस्सेदार या कामी सामिल केलेले नाहीत. वादीने दर्शविलेला वादी व प्रतिवादी

यांचा हिस्सा व चतुःसीमा त्याचप्रमाणे वादीने नमुद केलेल्या अ.नं.७ व ९ मधील मिळकती सर्व भाऊबंदाच्या समाईक आहेत. त्याच्याही वादी व प्रतिवादी यांच्या चतुःसीमा दिलेल्या नाहीत. अ.नं.७ मधील गट क्र.२१४ हे क्षेत्र हे उकिरडा पड असून ते याकामी सामिल केलेले नाही. त्याचप्रमाणे अ.नं.९ मधील गट नं.२२५ च्या क्षेत्रामध्ये पडीक घरे आहेत. त्याच्या चतुःसीमा दिलेल्या नाहीत. दावा कलम १अ मधील अ.नं. ३, ५ व ६ गट क्र.१११, १८४ व १९८ मध्ये समाईक विहिर असून त्यामध्ये अनेक हिस्सेदार आहेत. त्यांना दाव्यात सामिल केलेले नाही. गट क्र.१३७ हा जुनी समाईक वस्ती असून त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व त्यांचे दोन चुलते यांचा हिस्सा आहे. दावा कलम १अ मधील अ.नं.१०, ११, १२ मधील गट क्र.३८२, ३८७ व ३९० हे संपूर्ण प्रतिवादी क्र.१ यांचा भाऊ वामन यांच्या मुलाकडे कब्जेवहिवाटीस आहे.

८) प्रतिवादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, वादीने दर्शविलेली वंशावळ बहुतांशी चुकीची आहे. तसेच लिलावती हे नाव चुकीचे आहे. दावा कलम १अ ते १क मध्ये नमुद मिळकती या भाऊ गोविंद अडसुळ यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या होत्या व आहेत. सदर जमीनींचे सातबारा पाहिले तर भाऊ गोविंद अडसुळ यांच्या वारसांव्यतिरिक्त इतर अन्य लोकांची नावे आहेत. गट क्र.४५१ व ४५४ या मिळकती प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी त्यांच्या पैशातून वडिलांच्या नावे खरेदी केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.३ हे शेती खात्यामध्ये नोकरीस होते. त्या पैशातून त्यांनी गट क्र.४५४ प्रतिवादी क्र.१ यांच्या नावे खरेदी केलेला आहे. प्रतिवादी क्र.४ हे आर्मीमध्ये नोकरीस असताना त्यांच्या पैशातून गट क्र.४५१ प्रतिवादी क्र.१ च्या नावे खरेदी केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.४ व ५ च्या नावे बक्षीसपत्राने सदरचे क्षेत्र केलेले आहे. गट क्र.४५१ व ४५४ या स्वसंपादीत असल्याने त्यात वादीस वाटप मागता येणार नाही.

९) प्रतिवादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र.१ व त्यांचे भाऊ यांच्यामध्ये ब-याच वर्षापुर्वी वाटप झालेले आहे. वादीच्या मागणीप्रमाणे सन १९८७-८८ मध्ये सोमेश्वर येथे घर बांधून दिले व त्याचा संपूर्ण खर्च प्रतिवादी क्र.१ च्या कुटुंबाने केला व त्याबदल्यात तिने तिचा एकत्र कुटुंबातील हिस्सा सोडून दिलेला आहे. तसेच

प्रतिवादी क्र.६ ने देखील तिचा हिस्सा सोडून दिलेला आहे. एकत्र कुटुंबाच्या बैठकीमध्ये सर्वासमक्ष वादीने तिचा हक्क सोडून दिला होता. वादी हिस फुरसुंगी येथील जागा घेण्याकरीता प्रतिवादी यांनी र.रु.२,५०,०००/- दिले होते. त्यामुळे वादी हिस वाटप मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार राहिलेला नाही. वादी यांनी दि.१२.०८.१९८६ रोजी झालेला फेरफार व बक्षीसपत्र याबाबत कधीही तक्रार केलेली नाही. वादी हिने दावा मिळकतीमधील हक्क सोडून दिलेला असल्यामुळे तिला वाटप मागण्याचा तिला कोणताही अधिकार नाही.

**१०)** प्रतिवादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, वादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकत कोणाशी विक्री करण्याचे चर्चा अगर भाषा केलेली नाही. प्रतिवादी हे दावा मिळकतीची मेहनत मशागत करुन उत्पन्न घेवून कुटुंबाच्या आर्थीक गरजा पुर्ण करीत आहेत. प्रतिवादी यांना भागभांडवलाची गरज असते त्यामुळे प्रतिवादी यांना सदर मिळकतीवर कर्ज काढणे गरजेचे असते. तसा हक्क एकत्र कुटुंब प्रमुखास असतो. त्यामुळे वित्तीय संस्थेचा बोजा निर्माण करु नये अथवा गरज भासल्यास दावा मिळकत तबदील करु नये अशा प्रकारची बंधने कायद्याने घालता येणार नाही. सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होईल व दावा मिळकती वहिवाटणे सोयीचे होणार नाही. दावा मिळकती भांडवला अभावी पडीक राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकत्र कुटुंब प्रमुखाचे कायदेशीर अधिकारावर बंधने निर्माण होतील म्हणून प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी केली आहे.

**११)** वादी व प्रतिवादी यांची कथन ऐकले तसेच अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा आणि युक्तीवाद विचारात घेतला असता पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीची प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी |
| २. | सोयीचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | होकारार्थी |

३. जर तुर्तातुर्त ताकीद हुकूम दिला नाही तर वादीचे होकारार्थी
अपरिमित असे नुकसान होईल काय?

४. आदेश काय ? अंतिम
आदेशाप्राणे

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबत :-**

**१२)** मुद्दा क्र.१ ते ३ एकमेकांशी संल्लग्न व निगडित असल्याने पुराव्याच्या विवेचनाची पुनरावृत्ती होवू नये म्हणून ते एकत्रित चर्चेसाठी घेतले आहेत. वादीने त्यांच्या दाव्यातील कथनांच्या सत्यतेसाठी नि.३ सोबत मौजे काळज येथील गट क्र.३७८ प्रत साक्षांकित प्रत, मौजे काळज येथील फेरफार क्र.६६५, ५३८० ची साक्षांकित प्रत, मौजे सासवड येथील गट क्र.१५६३ चा सातबारा उता-याची साक्षांकित प्रत, मौजे सासवड येथील फेरफार क्र.१५६ ची साक्षांकित प्रत, मौजे तरडगांव येथील गट क्र.२९, १११, १३७, १८४, १९८, २१४, २२२, २२५, ३८२, ३८७, ३९०,४४८, ४५१, ४५४, २२ चे सातबारा उता-यांची साक्षांकित प्रत, मौजे तरडगांव येथील फेरफार क्र.९१२, ७०२९ ची साक्षांकित प्रत, तसेच नि.६७ सोबत मौजे काळज येथील गट क्र.३७८ चा सातबारा उतारा व फेरफार क्र.५९९५ ची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

**१३)** वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत आहे असे वादीचे म्हणणे आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमधील परिच्छेद क्र.७ मध्ये वादी ही त्यांची बहिण आहे ही बाब मान्य केलेली आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतमध्ये सांगितले की, वादी हिच्या मागणीप्रमाणे सन १९८७ ते १९८८ मध्ये सोमेश्वर येथील घर बांधण्याकरीता खर्च प्रतिवादी क्र.१ च्या कुटुंबाने केला आहे. प्रतिवादी यांनी वादीस फुरसुंगी येथील जागा घेण्याकरीता र.रु.२,५०,०००/- दिलेले आहेत. त्यावेळी वादीने तिचा एकत्र कुटुंबातील हिस्सा

सोडून दिला. तसेच एकत्र कुटुंबाच्या बैठकीमध्ये सर्व समक्ष तिने तिचा हक्क सोडून दिलेला आहे. त्यामुळे वादीचा दावा मिळकतीत कोणताही हिस्सा राहिलेला नाही. वादीने दावा मिळकतीतील तिचा संपूर्ण हिस्सा सोडून दिलेला आहे हे दाखवण्याकरीता प्रतिवादी यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतमध्ये गट क्र.४५४ व ४५१ हे स्वसंपादीत मालकीची मिळकत आहे असे नमुद केलेले आहे. परंतू, ते दाखवण्याकरीता प्रतिवादी यांनी कोणताही प्रथम दर्शनी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दिलेला नाही.

१४) वादीने सदरचा अर्ज हा दाव्याचे निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांनी दावा मिळकती त्रयस्थ इसमांना हस्तांतरीत करु नये किंवा त्यावर बोजा निर्माण करु नये याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी वादी ही त्यांची बहिण आहे व दावा मिळकत गट क्र.४५४ व ४५१ व्यतिरिक्त इतर दावा मिळकती या वडिलोपार्जित मालकीच्या आहेत असे मान्य केलेले आहे. यावरुन वादीस प्रथम दर्शनी केस आहे असे दिसून येते. म्हणजेच वादीचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे परंतू तो किती आहे हे सिध्द झालेले नाही. प्रतिवादी क्र.१, ७, ८, ९ व १० यांनी मौजे काळज येथील गट क्र.३७८ मधील संपूर्ण क्षेत्र लक्ष्मण हणमंत शिंदे व नितीन बाळासो शिंदे यांना दि.१२.०७.२०२१ रोजी विकलेले आहे. म्हणजेच सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी यांनी दावा मिळकत ही त्रयस्थ इसमास हस्तांतरीत केली आहे. त्यामुळे निश्चितच वादीला गैरसोय होणार आहे. यावरुन प्रतिवादी इतर दावा मिळकती देखील त्रयस्थ इसमांना हस्तांतरीत करतील अशी शक्यता दिसून येते. अशाच प्रतिवादी यांनी दावा मिळकती त्रयस्थ इसमास हस्तांतरीत केल्यास व त्यावर कोणत्याही प्रकारे बोजा निर्माण केला तर वादीची गैरसोय होवून दाव्यात गुंतागुंत निर्माण होईल. अशा परिस्थीतीत प्रतिवादींना तात्पुरते प्रतिबंधीत केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादी यांनी दावा मिळकती त्रयस्थ इसमास हस्तांतरीत केली तर वादीचे पैशात कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, दावा मिळकती या वादी व त्यांच्या इतर भाऊबंदाच्या समाईक जमीनी आहेत. परंतू दावा मिळकतीचे सातबारा यांचे अवलोकन केले असता सातबारा उता-यामध्ये

प्रत्येक सहहिस्सेदाराचे वेगवेगळे क्षेत्र नमुद केलेले आहे. म्हणजेच प्रत्येक सहहिस्सेदारांचे क्षेत्र वेगवेगळे आहे. त्यामुळे सदर आदेशाचा परिणाम इतर सह हिस्सेदारांवर होणार नाही. सदरचा आदेश हा निव्वळ प्रतिवादी यांचे हिश्यापुरता मर्यादीत आहे.

**१५)** वादीने प्रथम दर्शनी केस शाबीत केली आहे. सोयीचा समतोल वादीच्या बाजूने आहे. जर वादी मागतात तशी तुर्तातुर्त ताकीद दिली गेली नाहीतर वादीचेच अपरिमित नुकसान होईल व ते कोणत्याही स्वरुपात भरुन निघणार नाही. म्हणून सद्य परिस्थितीत वादीने मागितल्याप्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे व वादमुद्दा क्र.४ चे निष्कर्षादाखल पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. वादीचा नि.६० कडील तुर्तातुर्त ताकीद अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते १० यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यंत दाव्यातील मिळकती मध्ये असणारे क्षेत्र स्वतः अथवा इतर कोणाही मार्फत त्रयस्थ इसमांना हस्तांतरीत करु नये किंवा त्यावर कोणत्याही प्रकारे बोजा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम पारीत करण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात जोडण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात उदघोषित केला.)

PRATIBHA SAGAR MULE Digitally signed by PRATIBHA SAGAR MULE Date: 2026.01.15 17:50:13 +0530

फलटण. ( पी. एस. मुळे )

दि. १५/०१/२०२६ ४ थे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण